# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना

## लि.सोमेश्वरनगर,ता. बारामती,जि.पुणे

**उद्दिष्ठ एकरी १०० मे.टन ऊस उत्पादनाचे**



# उद्दिष्ट एकरी १०० मे.टन ऊस उत्पादनाचे :-

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनी,**

आपल्या कारखान्यामार्फत ऊस विकास योजनेअंतर्गत ऊस उत्पादन वाढीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये जमिनीची मशागत,माती व पाणी परिक्षण,उत्तम प्रतीचे शेणखतास पर्याय ठरलेले प्रेसमड कंपोष्ट खत पुरवठा, चांगले उत्पादनक्षम ऊस बियाणे व ऊस रोपे यांचा पुरवठा, संतुलीत सेंद्रीय खतांचा पुरवठा तसेच ताग / धैंच्या हिरवळीचे बियाणे यांचा पुरवठा या बाबी समाविष्ठ करण्यात आलेल्या आहेत. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रामध्ये सभासदांच्या शेतावर एकरी १०० मे.टन ऊस उत्पादन काढण्यासाठी उद्दिष्ठ एकरी १०० मे.टन ऊस उत्पादनाचा कार्यक्रम लागण हंगाम २०२०-२०२१ सालापासुन हाती घेतला आहे. या उद्दिष्ठ एकरी १०० मे.टन उत्पादन योजनेअंतर्गत ऊस शेतीची मशागतीपासुन ऊस तोडणी करणेपर्यंत करावयाच्या प्रमुख बाबींची माहिती आपणास देणेत येत आहे. या व्यतिरिक्त ऊस शेतीमधील प्रमुख शास्त्रज्ञ व प्रगतशील शेतकरी यांचेही मार्गदर्शन आपणास देण्यात येणार आहे. कारखाना शेती व ऊस विकास विभागाचे संपुर्ण कर्मचारी आपल्यासोबत राहणार आहेत. या सर्व बाबींमुळे व आपल्या प्रयत्नाने आपल्या शेतामध्ये एकरी १०० मे.टन ऊस उत्पादन निघेल याची आम्हाला खात्री आहे.

## एकरी १०० मे.टन ऊस उत्पादन घेण्यासाठी करावयाच्या प्रमुख बाबी :-

### अ) पुर्व मशागत



१) पुर्वीच्या ऊसाचे पाचट जमिनीमध्ये कुट्टी करून गाडुन घेणे.
२) दुहेरी नांगरट-नांगरणीची खोली दिड फुटापर्यंत उभी व आडवी नांगरट करावी.
३) सेंद्रीय खतांचा वापर-कारखाना कंपोष्ट खत/शेणखत एकरी १० टन पहिल्या नांगरटीनंतर शेतामध्ये मिसळुन नंतर दुसरी नांगरट करावी.
४) कल्टिव्हेटर करून सेंद्रीय खत चांगल्याप्रकारे जमिनीत मिसळून घेवुन सरी सोडावी.

### ब) सरी सोडणे :-



१) ऊस पिकाचे शरीरशास्त्र समजुन घेऊन ऊस पिकाला लागणारा सुर्यप्रकाश, हवा, पाणी यांचा बारकाईने विचार करून ऊसाच्या दोन सरीमधील अंतर कमीत कमी ४.५ फुट असणे गरजेचे आहे. यामुळे ऊस पिकामध्ये अन्न, हवा, पाणी व सुर्यप्रकाश यासाठी स्पर्धा निर्माण होणार नाही.
२) सरी सोडल्यानंतर सरीमध्ये लावणीपुर्वी गांडुळखत ५०० कि.ग्रॅ.त्यावर पेंडीयुक्त खत ४०० कि.ग्रॅ.(करंज पेंड १५० कि.ग्रॅ.+एरंडी पेंड १५० कि.ग्रॅ.+निंबोळी पेंड १०० कि.ग्रॅम टाकून बैलाच्या औजाराने ते सरीमध्ये मिसळुन घ्यावे.

### क) ऊस लागण पध्दत :-



१) लागणीचा कालावधी १ जुलै ते १४ ऑगस्ट (आडसाली ऊस)
२) ऊस जात को- ८६०३२ / कोएम-०२६५
३) रोप लागण- सरीतील अंतर ४.५ फुट व रोपातील अंतर २ फुट ठेवुन लागण करावी.
टिपरी लागण - सरीतील अंतर ४.५ फुट व २ डोळ्याच्या टिपरीतील अंतर ६ ते ९ इंच ठेवुन लागण करावी.

### ड) बियाणे निवड :-



ऊसाच्या नवीन लागणीकरिता शिफाशीत जातींचा अवलंब करावा. बियाणे निवडताना खालील बाबींची दक्षता घ्यावी
१) नवीन लागणीसाठी ९ ते ११ महिने वयाचा ऊस निवडावा. कारण या वयाच्या बियाणामध्ये ग्लुकोजचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे नविन डोळा उगवण्यास मदत होते.
२) जाड, रसरशित, लांब कांडीचा ऊस घ्यावा.
३) ज्या ऊसावर रोग किडीचा प्रार्दुभाव झाला आहे असा ऊस घेऊ नये. तसेच पांगश्या फुटलेले बियाणे घेऊ नये.

### ई) बिज प्रक्रिया :-



बावीस्टीन-१०० ग्रॅम + इमिडाक्लोप्रिड-३६ ग्रॅम+ १०० लिटर पाणी घेऊन १० मिनिटांपर्यंत बेणे प्रक्रिया करावी व त्यानंतर बेणे ॲसिटोबॅक्टर १ लिटर + पी.एस.बी.(स्फुरद विरघळविणारे जिवाणु) १ लिटर २०० लिटर पाण्यात मिसळुन द्रावणात ऊसाची टिपरी ३० मिनिटे बुडवुन लागण करावी.

### फ) तणनाशक :-

लागणीनंतर १ महिन्यानंतर २-४ डी- ८० मिली + मेट्रीब्युझीन-३० ग्रॅम प्रति पंपास(१५ लिटर पाण्यात)घेऊन फवारणी करावी.

## ग १) लागणीचा बेसलडोस

ऊस लागण करणेपुर्वी रासायनिक खत, सेंद्रीय खत, सुक्ष्म अन्नद्रव्य व किटनाशक यांचा एकत्रित बेसलडोस खालीलप्रमाणे द्यावा.

| अ.क्र. | खताचा तपशील | मात्रा |
|---|---|---|
| १ | डि.ए.पी.(१८:४६:००) | १५० किलो |
| २ | म्यु.ऑ.पोटॅश | १०० किलो |
| ३ | गंधक (दाणेदार) | १० किलो |
| ४ | सुक्ष्म अन्नद्रव्ये (मल्टी मायक्रो न्यूट्रीयंट) | २० किलो |
| ५ | रिजेंट किंवा फरटेरा (किटकनाशक) | १० किलो |

टिप : १) वरील सर्व खते २०० किलो गांडुळ खतामध्ये/वाळलेल्या शेणखतामध्ये मिसळुन सरीमध्ये टाकावीत किंवा पेरून घ्यावीत.
२) प्रेसमड कंपोस्टखत वापरल्यास वरील डोसामध्ये गंधक वापरण्याची आवश्यकता नाही.

## ग २) लागणीनंतर दुसरा डोस :- (लागणी पासुन २०/२५ दिवसांनी )

लागणीनंतर एक महिन्याने संपुर्ण प्लॉटचे निरीक्षण करून तुटाळ झाली असल्यास रोपांच्या सहाय्याने तुटाळी भरून घेवुन रायासनिक खताची दुसरी मात्रा द्यावी.

| अ.क्र. | खताचा तपशील | मात्रा |
|---|---|---|
| १ | युरिया | ५० किलो |
| २ | अमोनियम सल्फेट | ५० किलो |

## ग ३) लागणीनंतर तिसरा डोस :- (लागणी पासुन ४०/४५ दिवसांनी )

| अ.क्र. | खताचा तपशील | मात्रा |
|---|---|---|
| १ | युरिया | ५० किलो |
| २ | अमोनियम सल्फेट | ५० किलो |

## ग ४) लागणीनंतर चौथा डोस :- (लागणी पासुन ६०/६५ दिवसांनी )(बाळ बांधणी)

लागणीनंतर सुमारे ६० दिवसानंतर ऊसाची फुटव्याची अवस्था पाहुन बाळ बांधणी करणे आवश्यक आहे.
यावेळी खालीलप्रमाणे रासायनिक खतांची चौथी मात्रा द्यावी.

| अ.क्र. | खताचा तपशील | मात्रा |
|---|---|---|
| १ | युरिया | १०० किलो |
| २ | (२४:२४:००) | १०० किलो |
| ३ | पोटॅश | ५० किलो |

## ग ५) मोठी भरणी डोस :-

ऊस लागणीनंतर सुमारे १०० दिवसानंतर ऊसाची मोठी भरणी करणे आवश्यक आहे.
यावेळी खालीलप्रमाणे रासायनिक खतांची पाचवी मात्रा द्यावी.

| अ.क्र. | खताचा तपशील | मात्रा |
|---|---|---|
| १ | १२:३२:१६ | २०० किलो |
| २ | युरिया | २०० किलो |
| ३ | म्यु.ऑ.पोटॅश | ७५ किलो |
| ४ | गंधक (दाणेदार) | १० किलो |
| ५ | झिंक सल्फेट | १० किलो |
| ६ | फेरस सल्फेट | १० किलो |
| ७ | मॅग्नेशियम सल्फेट | २५ किलो |
| ८ | बोरॉन | २ किलो |

टिप : १) वरील सर्व खते २०० किलो गांडुळ खतामध्ये/वाळलेल्या शेणखतामध्ये मिसळुन सरीमध्ये टाकावीत किंवा पेरून घ्यावीत.
२) प्रेसमड कंपोस्टखत वापरल्यास वरील डोसामध्ये गंधक वापरण्याची आवश्यकता नाही.




## ह) ऊस पिकावर घ्यावयाची फवारणी :-

| फवारणी | ऊस लागणीनंतर | खत प्रकार | मात्रा |
|---|---|---|---|
| पहिली फवारणी | लागणीपासून ३५ ते ४० दिवसात १०० लिटर पाण्यात | हमला(क्लोरोपायरिफॉस ५०%+सायपरमेथ्रीन ५%) | २०० मिली |
| | | बावीस्टीन(कार्बेन्डॅझिम) | २०० ग्रॅम |
| | | १९:१९:१९ | ५०० ग्रॅम |
| | | सुक्ष्म अन्नद्रव्ये | ५०० मिली/ग्रॅम |
| | | IBA | २ ग्रॅम |
| | | 6BA ( IBA व 6BA सॉलव्हन्टमध्ये विरघळुन घ्यावे) | ४ ग्रॅम |
| दुसरी फवारणी | लागणीपासून ५५ ते ६० दिवसात १०० लिटर पाण्यात | क्लोरोपायरिफॉस (२०%) | २०० मिली |
| | | बावीस्टीन(कार्बेन्डॅझिम) | २०० ग्रॅम |
| | | १२:६१:० | ५०० ग्रॅम |
| | | सिविड एक्सट्रॅक्ट (कोमट पाण्यात विरघळुन घेणे) | १२० ग्रॅम |
| | | GA | ४ ग्रॅम |
| | | 6BA (GA व 6BA सॉलवंट मध्ये विरघळुन घ्यावे) | ६ ग्रॅम |
| तिसरी फवारणी | लागणीपासून ७५ ते ८० दिवसात १५० लिटर पाण्यात किड दिसल्यास | मोनोक्रोटोफॉस (किड दिसल्यास आवश्यकतेनुसार) | ३०० मिली |
| | | Z ७८ (आवश्यकतेनुसार तांबेरा रोग दिसल्यास) | ३०० ग्रॅम |
| | | १२:६१:० | १ किलो |
| | | पोटॅशियम शोनाईट | १ किलो |
| | | GA | ६ ग्रॅम |
| | | 6BA (GA व 6BA सॉलवंट मध्ये विरघळुन घ्यावे) | ८ ग्रॅम |
| चौथी फवारणी | लागणीपासून १०० दिवसांनी १५० लिटर पाण्यात | हमला | ३०० मिली |
| | | टिल्ट | १५० मिली |
| | | १३:००:४५ | १ किलो |
| | | पोटॅशियम शोनाईट | १ किलो |
| | | सिविड एक्सट्रॅक्ट (कोमट पाण्यात विरघळुन घेणे) | २०० ग्रॅम |
| | | GA | ८ ग्रॅम |
| | | 6BA (GA व 6BA सॉलवंट मध्ये विरघळुन घ्यावे) | १० ग्रॅम |

## ज) ऊस पिकासाठी जिवाणु खतांची/रासायनिक किटक नाशकांची आळवणी :-

| आळवणी | ऊस लागणीनंतर | खत प्रकार | मात्रा |
|---|---|---|---|
| पहिली आळवणी | लागणीपासून १० ते १५ दिवसांनी | अॅझोटोबॅक्टर | २ लिटर |
| | | पी.एस.बी. | २ लिटर |
| | | ट्रायकोडर्मा | २ लिटर |
| | | के.एम.बी. | २ लिटर |
| | २०० लिटर पाण्यात मिसळुन जमीनीत ओल असताना आळवणी करावी | | |
| दुसरी आळवणी | मोठया भरणी(बांधणी)नंतर १० व्या दिवशी | अॅझोटोबॅक्टर | २ लिटर |
| | | पी.एस.बी. | २ लिटर |
| | | के.एम.बी. | २ लिटर |
| | २०० लिटर पाण्यात मिसळुन जमीनीत ओल असताना आळवणी करावी | | |



## एकरी १०० टन ऊस उत्पादन घेण्यासाठी लक्षात घ्यावयाच्या महत्वाच्या सुचना :

* ऊस पिक शरीरशास्त्र समजुन घेऊन ते उत्तम येण्यासाठी माती व पाणी यांचा सामू (पी.एच.), क्षार (ई.सी.) यांचा विचार करून जमिनीची एकूण सुपिकता लक्षात घ्यावी. * प्रत्येकाने माती/पाणी परिक्षण अत्यावश्यक घटक समजुन वेळचेवेळी करून घ्यावे. * प्रत्येक ऊसाच्या बेटात किती हिरवी पाने असावीत त्यांची रूंदी किती असावी पानांमध्ये एकमेकांत अन्नासाठी स्पर्धा होत नाही ना याचा बारकाईने अभ्यास करावा जेणेकरून पानातील प्रकाश संश्लेशन क्रिया कमी होऊन अन्नद्रव्याची कमतरता भासता कामा नये. * दोन सरीतील अंतर,रोपांतील अंतर जमिनीच्या प्रकारानुसार ठेवावे. * आंतर पिक ऊसाला पुरक असावे. * ऊसांचा हिरवा पाला काढु नये तसेच वाळलेले पाचट जाळु नये. * पाणी व्यवस्थापन ठिबक सिंचनाने करावे. * रासायनिक खते मुळांच्या कक्षेत पेरून द्यावीत.

* आपले नम्र *

**राजेंद्र ना.यादव**
कार्यकारी संचालक

**शैलेंद्र पं.रासकर**
व्हा.चेअरमन

**पुरूषोत्तम रा.जगताप**
चेअरमन

**विराज र.निंबाळकर**
ऊस विकास अधिकारी

**व**
**सर्व संचालक मंडळ**

**बापुराव मा.गायकवाड**
शेतकी अधिकारी

अधिक माहितीसाठी ऊस विकास विभाग व शेती विभाग यांच्याशी संपर्क साधावा. संपर्क क्रमांक :- (०२११२) २८२४७६, २८२४७७, २८२४१२